# Regional Marathi Text Bulletin, Aurangabad
# Date – 04 October 2023
# Time 7.10 AM to 7.25 AM
# Language Marathi
# आकाशवाणी औरंगाबाद
# प्रादेशिक बातम्या
# दिनांक ०४ ऑक्टोबर २०२३ सकाळी ७.१० मि.

****

- दिवाळीनिमित्त आनंदाच्या शिध्यात पोहे आणि मैद्याचा समावेश करण्यास मंत्रिमंडळाची मंजूरी
- नांदेडच्या शासकीय रुग्णालयातील मृत्यू प्रकरणी चौकशी समिती स्थापन; दोषींवर कारवाईची मुख्यमंत्र्यांची ग्वाही
- छत्रपती शिवाजी महाराजांची वाघनखं भारतात आणण्याबाबत ब्रिटनच्या संग्रहालयासोबत  सामंजस्य करार

आणि

- आशियायी क्रीडा स्पर्धेत भारताची काल दोन सुवर्णांसह एकूण नऊ पदकांची कमाई

****

दिवाळीनिमित्त शिधापत्रिकाधारकांना शंभर रुपयात आनंदाचा शिधा देण्याच्या निर्णयाला राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. या आनंदाच्या शिध्यामध्ये, मैदा आणि पोहे या दोन घटकांचा समावेश करण्यासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली. आता या शिध्यामध्ये एक किलो साखर, एक लिटर खाद्यतेल तसंच प्रत्येकी अर्धा किलो रवा, चनाडाळ, मैदा आणि पोहे असा शिधा राहील. हा आनंदाचा शिधा २५ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर पर्यंत वितरित करण्यात येईल.

कृषी पंप वीज जोडण्या वेगाने पूर्ण करण्यासाठी उच्च दाब वितरण प्रणालीला ३१ मार्च २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय काल घेण्यात आला. या योजनेतून विदर्भ, मराठवाड्यातल्या प्रलंबित कृषी पंप वीज जोडण्या पूर्ण करण्यात येतील.

अल्पसंख्याक समाजातल्या विद्यार्थ्यांसाठी परदेशी शिक्षणाकरता शिष्यवृत्ती योजना राबवण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली. दरवर्षी २७ विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार असून, या योजनेसाठी १० कोटी ८० लाख रुपये खर्चास देखील मंजुरी देण्यात आली.

इमारतींच्या पुनर्विकास प्रक्रियेला वेग देण्यासाठी संबंधित अधिनियमात सुधारणा करण्यालाही मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. यानुसार पुनर्विकासाला विरोध करणारे रहिवासी किंवा सभासदांविरुद्ध निष्कासनाची कार्यवाही करण्याकरता अधिनियमात तरतूद करण्यात येणार आहे.

****

राज्यात नुकसान झालेल्या सोयाबीन पिकांचे पंचनामे सुरू करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल मंत्रिमंडळ बैठकीत दिले. लातूर, नांदेडसह नऊ जिल्ह्यांमध्ये सोयाबीनवर पिवळा मोझॅक तसंच खोडकूज, मूळकूज या बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाला आहे. नुकसान झालेल्या क्षेत्रामध्ये विमा संरक्षित क्षेत्राचा अंतर्भाव असल्यामुळे विम्याची मदत वेळेत करणं शक्य व्हावं, यासाठी कृषी विभाग तसंच मदत आणि पुनर्वसन विभागांनी संयुक्तपणे प्राधान्याने हे पंचनामे करावेत असे निर्देश देण्यात आले आहे.

****

नांदेड इथल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात रुग्णांचे मृत्यू ही बाब सरकारने गांभीर्याने घेतली असून, या घटनेची चौकशी केली जाईल तसंच दोषींवर कारवाई केली जाईल असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं आहे. ते म्हणाले...

> ***''नांदेड झालेली घटना, झालेले मृत्यू याची चौकशी होईल आणि चौकशीअंती कुणाचा दोष असेल तर नक्की त्याच्यावर कारवाई केली जाईल. परंतू सरकारने ही बाब अतिशय गांभीर्याने घेतलेली आहे.***''

****

राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ आणि जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी काल या शासकीय रुग्णालयास भेट देऊन घटनेची माहिती घेतली. यावेळी माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, खासदार प्रताप पाटील चिखलीकर उपस्थित होते. या प्रकरणाच्या चौकशीसाठी त्रिसदस्यीय समिती स्थापन करण्यात आली असून, ही समिती आपला अहवाल दोन दिवसात सादर करेल, या

रुग्णालयातली वर्ग तीन तसंच चारची रिक्त पदं तत्काळ भरण्यात येतील, असं मुश्रीफ यांनी सांगितलं. ते म्हणाले...

***''हे जे मृत्यू झालेले आहेत त्याची सखोल चौकशी करून खरोखरच ह्याच्यामध्ये कोणाचा हलगर्जीपणा होता का, औषधाचा पुरवठा नव्हता का, याला कारणं काय ह्याची सखोल चौकशी करण्यासाठी आम्ही जी समिति नेमलेली आहे, त्याची उच्चस्तरीय समिती आम्ही पुन्हा नेमू. त्याचा अहवाल घेऊ आणि आजच्या आमच्या बैठकीमध्ये ज्या अडचणी आमच्या लक्षामध्ये आल्या, त्या आम्ही तात्काळ दूर करण्याच्या प्रयत्न करू. क्लास थ्री आणि क्लास फोर ची पदं ही आम्ही तात्काळ भरू.''***

विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार आणि अंबादास दानवे आज नांदेड इथं रुग्णालयाला भेट देऊन घटनेची माहिती घेणार आहेत.

दरम्यान, शासकीय रुग्णालयात येणारे बहुतांशी रुग्ण हे मरणासन्न अवस्थेत असतात, त्यामुळे डॉक्टरांनी प्रयत्न करूनही बरेचदा रुग्णाचा मृत्यू होत असल्याचं, छत्रपती संभाजीनगर इथल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय-घाटीचे अधिष्ठाता, डॉ संजय राठोड यांनी म्हटलं आहे. औषधांच्या अभावाने रुग्ण दगावत असल्याचा आरोप त्यांनी फेटाळून लावला. ते म्हणाले...

***''मृत्यू हा अटळ आहे. आणि आमचं दुर्दैवं की आमच्याकडे जो पेशंट येतो, हा टर्मिनस स्टेजेस्‌ला येतो. आणि त्यावेळेस आम्ही आमचे प्रयत्न करतो. तरी पण ह्या घटना घडतात. औषधाच्या बाबतीमध्ये कुठलीही तक्रार नाही. जिथे जिथे अशा सिरीयस पेशंटस्‌ची ट्रीटमेंट होते, तिथे आम्ही औषधी उपलब्ध करून दिलेल्या आहेत. आमच्याकडून औषधी उपलब्ध करून दिल्या जातात. नाहीतर आम्ही लोकल पर्चेसमधून देतो. ते ही नाही झालं आम्ही नातेवाईकांना पण सांगतो की नाहीये हे. ते ही जरी नसेल आमच्याकडे दहा – पंधरा एन जी ओ अशा व्हॉलिंटरीली रेजिस्टर्ड केलेल्या आहेत, त्यांच्याकडून आम्ही उपलब्ध करून घेतो.''***

****

राज्यभरातल्या सुमारे दोन हजार ३५९ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी येत्या पाच नोव्हेंबरला मतदान होणार आहे. ग्रामपंचायतींमधल्या दोन हजार ९५० सदस्यपदाच्या; तर १३० सरपंचांच्या रिक्तपदांच्या पोटनिवणुकांसाठी याच दिवशी मतदान होणार असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण द्यावं, ही आमची भूमिका कायम असल्याचं, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि खासदार सुनिल तटकरे यांनी स्पष्ट केलं आहे. ते काल मुंबईत पक्षाच्या ओबीसी सेलच्या बैठकीत बोलत होते. बिहारच्या धर्तीवर जातीनिहाय जनगणनेची मागणी सरकारकडे करणार असल्याचं तटकरे यांनी सांगितलं.

****

छत्रपती शिवाजी महाराज यांची वाघनखं भारतात आणण्याबाबत, ब्रिटनच्या व्हिक्टोरिया अँड अलबर्ट संग्रहालयासोबत काल सामंजस्य करार करण्यात आला. सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार, उद्योग मंत्री उदय सामंत, सांस्कृतिक विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे, राज्य पुरातत्व सर्वेक्षण आणि संग्रहालयाचे संचालक तेजस गर्गे हे यावेळी उपस्थित होते.

शिवछत्रपतींची ही वाघनखं तमाम शिवप्रेमींसाठी एक प्रकारे शिवदर्शन ठरणार आहे, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.

****

थोर स्वातंत्र्यसेनानी तसंच मराठवाडा मुक्तीसंग्रामाचे प्रणेते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या जयंतीनिमित्त विधानभवन परिसरातल्या त्यांच्या पुतळ्यास, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि विधान परिषदेच्या उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी काल पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केलं.

छत्रपती संभाजीनगर इथं स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा संशोधन संस्थेतही स्वामीजींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

****

आशियायी क्रीडा स्पर्धेत भारताने काल दोन सुवर्ण, दोन रौप्य आणि पाच कांस्य पदकांची कमाई केली. आतापर्यंत १५ सुवर्ण, २६ रौप्य आणि २८ कांस्यपदकांसह ६९ पदकं जिंकून भारत पदकतालिकेत चौथ्या क्रमांकावर कायम आहे.

***‘‘महिलांच्या पाच हजार मीटर धावण्याच्या स्पर्धेत पारुल चौधरीने सुवर्णपदक जिंकलं. तर भालाफेक स्पर्धेत अनुराणीने सुवर्ण पदक पटकावलं. पुरूषांच्या आठशे मीटर धावण्याच्या स्पर्धेत मोहमद अफजलनं तर पुरुषांच्या डेक्थलॉन स्पर्धेत तेजस्वी शंकर याने रौप्य पदक पटकावलं. महिलांच्या चारशे मीटर अडथळ्यांच्या स्पर्धेत विद्या रामराज हिने, पुरुषांच्या***

*तिहेरी उडीत प्रवीण चित्रवेलने दुहेरी नौकानयनात अर्जुनसिंह आणि सुनीलसिंह यांनी, महिलांच्या मुष्टियुद्ध प्रकारात प्रिती पवारने, तर पुरुषांच्या मुष्टियुद्ध प्रकारात नरेंद्र बेरवाल याने कांस्यपदक जिंकलं. महिलांच्या मुष्टियुद्ध स्पर्धेत लवलीना बोरगोहाईनने ७५ किलो वजन गटात अंतिम फेरीत धडक मारली आहे.''*

****

नाशिक जिल्ह्यात १४ दिवसांनंतर कांद्याचा लिलाव सुरु झाला आहे. लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत काल कांद्याला प्रतिक्विंटल सरासरी दोन हजार रूपये भाव मिळाला. अन्य बाजार समित्यांमध्ये देखील सर्व व्यवहार सुरळीत सुरू झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

धाराशिव जिल्ह्यात स्वच्छतेची व्याप्ती वाढवण्यासाठी पहिल्या टप्प्यात आठ तालुक्यातल्या ८० गावांचं मूल्यांकन केलं जाणार आहे. त्यामुळे जिल्ह्यात स्वच्छतेला गती मिळणार आहे. याबाबत अधिक माहिती देत आहेत आमचे वार्ताहर …

*''गावातल्या कचरा साठवण्याचे ठिकाण, कचरा संकलन आणि विलगीकरण, कचरा वर्गीकरण, उघड्यावर शौच बंद करून शौचालयांचा वापर वाढवण, शौचालयांना नळ जोडणी, उघड्यावर सोडलेल्या सांडपाण्याच व्यवस्थापन, शोष खड्डे निर्मिती, वृक्ष लागवड आणि गावकऱ्यांच्या श्रमदानातून सुशोभीकरण, प्लास्टिक कचरा संकलन आणि त्याचं व्यवस्थापन, कचऱ्यासाठी कंपोस्टिंग सुविधा यावर मूल्यांकन केलं जाणार आहे. याची गुणांकन प्रतवारी करून गावात स्वच्छतेसाठी प्रोत्साहन दिलं जाणार आहे.''*

**देविदास पाठक,आकाशवाणी वार्ताहर, धाराशिव**

****

परभणी जिल्ह्यात विविध योजनांतर्गत मंजूर विकास कामं वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना, जिल्हा विकास समन्वय आणि संनियंत्रण समिती–दिशा चे अध्यक्ष तथा खासदार संजय जाधव यांनी दिल्या आहेत. ते काल जिल्हाधिकारी कार्यालयात दिशा समितीच्या आढावा बैठकीत बोलत होते.

****

हिंगोली जिल्ह्याच्या कळमनुरी तालुक्यात कोंढुर, डिग्रस इथं कयाधू नदीवर पूल बांधण्याच्या मागणीसाठी ग्रामस्थांनी काल कयाधू नदीच्या पात्रात उतरून आंदोलन केलं. पोलीस प्रशासनाने आंदोलकांना नदी पात्रातून बाहेर काढल्याचं आमच्या वार्ताहराने कळवलं आहे.

****